Vol II Issue X

ISSN No : 2230-7850

Monthly Multidisciplinary
Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor

Ashok Yakkaldevi

Editor-in-chief

H.N.Jagtap

## Welcome to ISRJ

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume 2, Issue.10,Nov. 2012
**ISSN:-2230-7850**

Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# यशवंतराव चव्हाण यांचे अर्थकारण : एक अभ्यास

**संतोष कुऱ्हे**

लोकप्रशासन विभागप्रमुख
स्वा. सै. सूर्यभानजी पवार महाविद्यालय, पूर्णा जि. परभणी

**सारांश :**

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्राचे द्रष्टे नेते म्हणून ओळखले जातात. त्यांनी महाराष्ट्र तसेच संपूर्ण भारताच्या आर्थिक विकासासाठी विशेष प्रयत्न केले होते. तसेच त्यांनी भारतीय अर्थव्यवस्थेला वेगळा आकार देण्याचा प्रयत्नदेखील केला. त्यांच्या या प्रयत्नांना संमिश्र यश आले. या संशोधन लेखामध्ये यशवंतराव चव्हाणांच्या अर्थकारणावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**विशेष शब्द :**

अर्थकारण, आर्थिक विकास इत्यादी

**प्रस्तावना :**

संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री आणि आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून यशवंतराव चव्हाण यांना ओळखल्या जाते. त्यांचा जन्म दि. १२ मार्च १९१३ रोजी सातारा जिल्ह्यातील देवराष्ट्रे (सध्या सांगली जिल्हा) या गावी झाला.

दि. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली आणि नविन राज्याचे पहिले मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांचा शपथविधी झाला. तसेच २६ जुन १९७० रोजी त्यांची केंद्रीय अर्थमंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली. यशवंतराव चव्हाण हे देशाचे ११ वे अर्थमंत्री होते. १९७१-७२ ते १९७४-७५ या चार वर्षांचे अर्थसंकल्प यशवंतराव चव्हाण यांनीच सादर केले. तसेच यशवंतराव चव्हाण यांच्या अर्थशास्त्रीय विचारांवर एम. एन. रॉय यांच्या विचारांचा प्रभाव जाणवतो.

**उद्देश :**

या संशोधन लेखाचे उद्देश खालीलप्रमाणे आहेत.

१. यशवंतराव चव्हाण यांच्या आर्थिक विचारांचा आढावा घेणे.
२. तसेच त्यांनी आर्थिक विकासाबाबत केलेले प्रयत्न यावर प्रकाश टाकणे.

**माहिती संकलन :**

या लेखासाठी माहितीचे संकलन प्रामुख्याने द्वितीयक स्त्रोतांमधून करण्यात आलेले आहे. ज्यामध्ये विविध ग्रंथ, लेख संपदा तसेच इंटरनेट आदिंवर प्रकाशीत झालेली माहिती वापरण्यात आली आहे.

**देशासमोरील आर्थिक प्रश्न :**

मार्च १९७१ मध्ये झालेल्या निवडणूकीमध्ये काँग्रेस पक्षाला मोठ्या प्रमाणात यश प्राप्त झाले. महाराष्ट्रात काँग्रेसला ४४ पैकी ४३ जागा मिळाल्या. दरम्यानच्या काळातील काँग्रेसचे विभाजन, बँकांचे राष्ट्रीयीकरण, संस्थानिकांचे तनखे बंद करणे व इंदिरा गांधींचा गरीबी हटाव हा कार्यक्रम विचारात घेता अर्थमंत्रालयासमोर अनेक महत्वाचे प्रश्न होते, ते पूढीलप्रमाणे आहेत.

१. सन १९७०-७१ हे आर्थिकदृष्ट्या महागाईचे वर्ष होते.
२. देशात दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती.
३. देशात अन्नधान्य समस्या निर्माण झाली.
४. भारतीय जनता महागाईच्या वणव्यामध्ये भरडली जात होती.
५. विरोधी पक्षांनी महागाईच्या प्रश्नावर

**अर्थमंत्री म्हणून कार्य :**

यशवंतराव चव्हाण यांनी अर्थमंत्री असतांना पूढील प्रमाणे कार्य केले.

१. आर्थिक क्षेत्राच्या संदर्भाने अनेक महत्वाचे कायदे मंजूर केले.
२. आर्थिक प्रश्नांचा विस्तृत अभ्यास करुन अर्थ मंत्रालय पातळीवर नियोजन.
३. देशातील महागाई नियंत्रणात आणण्यासाठी प्रयत्न.
४. देशातील करदात्यांचे प्रमाण वाढवून कर चुकवेगिरीवर नियंत्रण.
५. गरिबी हटाव योजनेशी पूरक निर्णय आणि आर्थिक तरतुद उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला.

**अंदाजपत्रक :**

अंदाजपत्रकाला इंग्रजी भाषेत Budget असे म्हणतात. अंदाजपत्रक म्हणजे एका निश्चित काळासाठी केलेली सरकारची आर्थिक योजना होय.

१. महसूली जमा :विविध कर, शुल्क, व्याज, उपकर सरकारी सेवेचे शुल्क इत्यादी व्यवहाराद्धारे जमा झालेल्या राशींचा समावेश होतो.
२. महसूली खर्च :देशाचा कारभार चालविण्यासाठी म्हणजेच प्रशासनावरील खर्च, घेतलेल्या कर्जावरील व्याज, वेगवेगळ्या योजनांवर देण्यात येणारी अनुदाने इत्यादींचा समावेश होतो.
३. भांडवली खात्यावरील जमा :
देशातील जनतेकडून तसेच मध्यवर्ती बँकेकडून घेण्यात आलेली कर्जे, विदेशाकडून घेतलेली कर्ज आणि कर्ज वसूली यांचा समावेश केला जातो.
४. भांडवली खर्च :देशातील दीर्घकालीन विकासाच्या योजनांसाठी, त्या योजनांमध्ये सुधारणा करण्यासाठीचा खर्च समाविष्ट होतो.

थोडक्यात सरकारला प्राप्त होणारे उत्पन्न हे विविध प्रकारचे कर, कर्ज आणि बगर कर्ज या मार्गाने प्राप्त होते. बिगर कर उत्पन्नामध्ये दंड, सेवा उत्पन्न, प्रशासकीय उत्पन्न, सार्वजनिक उपक्रम, बँका इत्यादीचा समावेश होतो. यशवंतराव चव्हाण अर्थमंत्री झाल्यानंतर ते सतत १० ऑक्टोबर १९७४ पर्यंत या पदावर होते.

**यशवंतराव चव्हाण यांची अर्थशास्त्रीय भूमिका :**

यशवंतराव चव्हाण यांची अर्थशास्त्रीय भूमिका पूढीलप्रमाणे मांडता येईल. शेतकरी हाच महाराष्ट्राचा प्राण असून शेतकरी हेच महाराष्ट्राचे राज्यकर्ते आहे, असे महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण जाहिरपणे सांगतात. शेतीच्या क्षेत्रात पुरोगामी पावले टाकून प्रत्यक्ष निर्णय करण्याचे कार्य महाराष्ट्राने यशवंतरावांच्या कारकिर्दीत सर्वप्रथम केले. शेत-जमीनीच्या कमाल धारणेवर मर्यादा घालण्याचा कायदा करुन या मुख्यमंत्र्यांनी, महाराष्ट्र हा खया अर्थाने पुरोगामी असल्याचे देशात याच काळात प्रत्ययास आणून दिले. सन १९६१ च्या जानेवारी महिन्यामध्ये महाराष्ट्रातील शेत-जमीनीबाबतचे विधेयक समोर आले आणि या विधेयकामुळे दुरगामी अशा जमीन सुधारणेचा पाया घातला गेला. केंद्र सरकारने सिलींगचा कायदा करण्याचा विचार, त्यानंतर दहा-बारा वर्षांनी केला. यात यशवंतरावांच्या ठिकाणचा, ग्रामीण आणि शेतीविषयक द्रष्टेपणाचा प्रत्यय येतो.

यशवंतरावांनी महाराष्ट्राला जी प्रमुख देण आहे ती, समाजवादाचे विचार रुजविण्याच्या आचरणाची. महाराष्ट्रात सर्वप्रथम समाजवाद आणण्याची घोषणा यशवंतरावांनी १९६२ साली केली आणि त्यांना अभिप्रेत असलेला समाजवाद प्रत्यक्षात आणण्याची जबाबदारीही त्यांनी स्विकारली. केवळ जबाबदारीच स्विकारुनच ते थांबले नाहीत तर आपल्या मुख्यमंत्री पदाच्या कारकिर्दीत कृषि-औद्योगिक समाजरचनेची निर्मिती करण्याची आखणी करुन त्यांनी ही योजना आंमलात आणली. ग्रामीण समाजाचा आर्थिक चेहरा-मोहरा बदलण्याच्या ध्येयाची बांधिलकी त्यांनी स्वातंत्र्य काळापासून कार्यकर्ता या नात्याने स्विकारली होती.

भारताच्या लोकसंख्येत दरवर्षांनी होणाया वाढीमुळे आर्थिक विकासाचा वेग स्वातंत्र्योत्तर काळामध्ये अपेक्षित रितीने वाढविता आला नाही. आर्थिक विकास ही गुणात्मक आणि संख्यात्मक संज्ञा आहे. सामाजिक व आर्थिक विकास करतांना साम्यवादी देशांमध्ये केंद्रीय नियोजन असते. भारतात योजना आखण्याचे कार्य नियोजन मंडळ करते. नियोजनाद्धारे पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून समाजवादी विचारधारा प्रवाहित करण्याचे कार्य प्रामाणिकपणे न झाल्याने आर्थिक विषमतेची दरी रुंदावली. यशवंतराव चव्हाण यांना समाजवादाबद्दल आस्था होती. भारताचा आर्थिक विकास जलदगतीने व्हावा, कृषि तंत्रज्ञानाचा पुरेसा वापर होवून कृषि क्षेत्रात क्रांती व्हावी असे वाटत होते.

**सारांश :**

यशवंतराव चव्हाण काही अर्थतज्ञ नव्हते. त्यामुळे अर्थसंकल्प सादर करतांना पक्ष, सरकार, वित्त मंत्रालय, आयात-निर्यात, व्यापार, देशांतर्गत दबाव गट आणि विरोधी पक्ष इत्यादींच्या भूमिकांचा विचार करावा लागतो. यशवंतराव चव्हाणांनंतर झालेल्या अर्थमंत्र्यांमध्ये डॉ. मनमोहनसिंग यांचा अपवाद वगळल्यास अर्थव्यवस्थेची घडी नीट बसविता आली नाही, हे सत्य स्विकारले पाहिजे.

यशवंतरावांनी भारतीय समाज जीवनाच्या गरजा आणि आकांक्षा समोर ठेवून अर्थव्यवस्थेला वेगळा आकार देण्याचा प्रयत्न केला. त्यात त्यांना यश आले असे पूर्णपणे म्हणता येणार नाही. तसेच ते अयशस्वी झाले असेही म्हणता येत नाही. तसेच ते अयशस्वी झाले असेही म्हणता येत नाही. त्यांच्यावर पक्षाने आणि पक्ष नेतृत्वाने टाकलेली जबाबदारी पूर्ण करण्याचा त्यांनी मनापासून प्रयत्न केला हेच सत्य स्विकारावे लागेल.

**संदर्भ :**

१. लोकराज्य, मार्च २०१२.
२. डॉ. गंगाधर वि. कायंदे, यशवंतराव चव्हाण, चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net